FORM-I A

N.C.R.B.
I.I.F.-1

# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र, जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे ला.प्र.वि., पहिली खबर क्र. ३९ / १८, दिनांक ३१/१०/२०१८
   State District Police Station FIR No. Year Date
2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम कलमे Sections ७
   (ii) अधिनियम Act १९८८ (सुधारणा-२०१८), कलमे Sections —
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections —
3. (a) अपराधाची घटना : वार ........, तारीख पासून २३/१०/१८, वेळ १२:००, तारीख पर्यंत ३१/१०/१८ वेळ ........
   Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा तारीख ........, वेळ ........
   Information received at P.S. Date Time
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. ........, तारीख ३१/१०/२०१८, वेळ ........
   General Diary Reference : Entry No. Date Time
4. माहितीचा प्रकार Type of Information : ........, लेखी / तोंडी Written / Oral लेखी
5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ........, चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. ........
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P.S. Chouki/Beat/O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव म्हाडा सी-३ वॉर्ड, ठिकाणाचे नंबर मुं.इ.दु.पु.मं., गल्ली १०-१२, रस्त्याचे नाव रोपा लेन,
   Address of Occurrence Name चंदनवाडी No. if any मरीनलाईन्स Ward मुंबई Name of road
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ........, गाव ........, पोस्ट ........, तालुका ........, जिल्हा ........, राज्य महाराष्ट्र
   Nearest identifiable Place Village Post Taluka Distt. State
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव ........, तालुका ........, जिल्हा ........, राज्य ........
   In case, outside the limit of this Police Station Taluka Distt. State
6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name इम्रान खत्री (b) वडीलाचे / पतीचे नाव महम्मदअली खत्री
   Father's /Husband's Name
   (c) जन्म तारीख व वय ३३ वर्षे (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. ७०२१९४८८३०
   Date of Birth & Age Nationality Phone No.
   (e) पारपत्र क्रमांक — दिल्याचा दिनांक — दिल्याचे ठिकाण — (f) व्यवसाय म्हाडा कॉन्ट्रॅक्टर
   Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
   (g) धर्म Religion मुस्लीम, जात Caste —, जनजात Sub-Caste —
   (h) पत्ता : फ्लॅट-७०७ गल्ली / सर्वे नं. एम-2 घर / नाव नंबर दौलतनगर फोन /मो. नंबर ........ पॅन नं ........ वोटर्स नं. ........
   Address : Ward House/Name No. Phone/M. No. Par No. Card No.
   रस्त्याचे नाव ........ जवळचे प्रसिद्ध ठिकाण सांताक्रूझ (प) गाव ........ पोस्ट मुंबई पो. स्टे. ........
   Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
   तालुका ........ जिल्हा मुंबई राज्य महाराष्ट्र सध्याचा पत्ता ........
   Taluka Distt. State Present Address
7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)
   - सुर्यकांत शंकरराव देशमुख, वय ५५ वर्षे, धंदा - कार्यकारी अभियंता, नेमणुक - म्हाडा सी-३ वॉर्ड, मुंबई इमारत दुरुस्ती व पुर्नरचना मंडळ, रोपा लेन, चंदनवाडी, मरीनलाईन्स मुंबई
   रा. ठि. फ्लॅट नं. ७/८, गंगाई सोसायटी, ओल्ड एम.एच.बी. कॉलनी, एल.टी. रोड, बोरिवली (प) मुंबई.

Scanned by CamScanner

## फिर्याद

दि. ३१/१०/२०१८

इम्रान महम्मदअली खत्री, वय ३३ वर्षे, धंदा– म्हाडा कॉन्ट्रक्टर, रा.ठि – फ्लॅट नं.७०७, बिल्डींग नं. एम–२, दौलतनगर, सांताक्रुझ (प), मुंबई नं.४०००५४. मो नं. ७०२१९४८४३०.

.................

मी वरील प्रमाणे असुन, वर नमुद ठिकाणी गेल्या ०९ वर्षापासून राहत आहे. माझे सोबत माझे वडील महम्मदअली खत्री, वय ६१ वर्षे, आई श्रीमती रेहमत महम्मद अली खत्री, वय ५५ वर्षे, माझी पत्नी रूबीना इम्रान खत्री, वय ३२वर्षे, माझी मुलगी रेहाना, वय ६महिने आणि माझा भाऊ सोहेल महम्मदअली खत्री, वय २५वर्षे असा परिवार एकत्रितरित्या रहात आहेत.

माझा चुलत भाउ तय्यब खत्री याचे स्वतःचे नावाने म्हाडाचे कॉट्रॅक्टर लायसन्स आहे व सदरबाबत त्याचे रजिस्ट्रेशन देखील आहे. त्याचे कंपनीचे नाव टी.एस.के. कॉर्पोरेशन असे आहे. माझेकडे स्वतःचे रजिस्ट्रेशन नसल्याने मी टी.एस.के. कार्पोरेशन या कंपनीच्या नांवाने ' १४–१६ एम.एस.एस लेन, (महादेव शंकर शेठ लेन), सोनापुर लेन, मरीनलाईन्स (पु), मुंबई' येथील म्हाडाच्या जुन्या 'सेज' (प्रॉपर्टी नं.सी–३५३०–३१, मेजरमेंन्ट बुक नं.६१७६८) अंतर्गत इमारतीचे दुरूतीचे कामकाज मिळविण्याकरीता फेब्रुवारी २०१८ मध्ये On Line पध्दतीने टेन्डर भरले होते. सदरचे कामकाज हे **रू.७,९८,०००/–** चे होते व त्याकरीता माझ्यासह आणखी ३/४ जणांनी देखील On Line पध्दतीने टेन्डर भरले होते. मी सदरचे काम मिळविण्याकरीता मला परवडेल अशा पध्दतीने मुळ रक्कमेच्या ४.९५ टक्के जास्त रक्कमेचे टेन्डर भरले होते. कालांतराने On Line पध्दतीचा रिझल्ट लागल्यानंतर मी काम करीत असलेल्या टी.एस.के.कार्पोरेशनला सदरचे काम मिळाले.

सदरचा रिझल्ट On Line पध्दतीने मी करीत असलेल्या कंपनीस लागल्यानंतर मी, सी–३ वॉर्ड कार्यालय, रोपा लेन, चंदनवाडी, मरीनलाईन्स (पुर्व), मुंबई येथे येवून माझ्या कंपनीच्या नांवाने फाईल तयार होवून मुख्य कार्यालय, बांद्रा, मुंबई येथे गेली होती. तेथून सदरची फाईल मंजुर होवून सी–३ वॉर्डमध्ये आल्यानंतर आमच्या कंपनीच्या नांवाने ॲग्रीमेंन्ट तयार करण्याकरीता सदरची फाईल पुन्हा मुख्य कार्यालय, बांद्रा, मुंबई येथे गेली होती. सदर ठिकाणी आमच्या 'टी.एस.के.कर्पोरेशन कंपनी' आणि 'म्हाडा' यांचेमध्ये ॲग्रीमेंन्ट झाले. त्यानंतर सदरची फाईल ही पुन्हा सी–३ वॉर्डमध्ये आल्यानंतर आमच्या कंपनीला संबंधीत कामाकरीता 'वर्क ऑर्डर माहे मे २०१८ मध्ये मिळाली. त्यानुसार उप–अभियंता, कार्यकारी अभियंता आणि आर्कीटेक यांनी माझ्यासमवेत १४–१६ एम.एस.एस लेन, (महादेव शंकर शेठ लेन), सोनापुर लेन, मरीनलाईन्स (पु), मुंबई येथील म्हाडाच्या जुन्या इमारतीची प्रत्यक्ष घटनास्थळी येवून पहाणी केली. त्यानंतर मी करीत असलेल्या कंपनीमार्फतीने इमारत दुरूस्तीचे कामकाज सुरू झाले.

सदरचे बिल्डींग दुरूस्तीचे कामकाज अंदाजे चार महिन्यापुर्वी सुरू झाल्यानंतर आम्ही ते कामकाज सप्टेंबर–२०१८ अखेरीस पुर्ण केले व आर्कीटेकच्या सहीनिशी सी–३ वॉर्डमध्ये कामकाजाचे रू.८,०५,६१६/– च्या बिलाची फाईल सादर केली. सदर बिलाच्या फाईलवर उप–अभियंता यांनी स्वाक्षरी केल्यानंतर, सदर बिलाची फाईल ही कार्यकारी अभियंता श्री. सुर्यकांत.एस.देशमुख, मुंबई इमारत दुरूस्ती व पुर्नरचना मंडळ, मुंबई यांचेकडे स्वाक्षरीकरीता आली. त्याप्रमाणे दिनांक २३/१०/२०१८ रोजी दुपारी १२.०० वा चे सुमारास मी म्हाडा सी–३ वॉर्डचे कार्यकारी अभियंता श्री. सुर्यकांत.एस.देशमुख, मुंबई इमारत दुरूस्ती व पुर्नरचना मंडळ, मुंबई यांचेकडे आलो व त्यांना सदर फाईलवर सही करण्याबाबत विनंती केली. त्यावेळी कार्यकारी अभियंता श्री. एस. एस.देशमुख यांनी मला सदर फाईलवर सही करण्याकरीता व बिलाच्या मंजुरीकरीता एकूण बिलाच्या रक्कमेच्या



Scanned by CamScanner

२ टक्के रक्कम लाच म्हणून मागणी केली. कार्यकारी अभियंता श्री. एस.एस.देशमुख यांनी मला २ टक्के रक्कम म्हणजेच रू.१६,०००/– आणि दक्षता क्वॉलीटी कंन्ट्रोलच्या नांवाने अतिरिक्त रू.५,०००/– असे एकूण रू.२१,०००/– च्या लाचेची मागणी केली.

मला कार्यकारी अभियंता सुर्यकांत देशमुख, मुंबई इमारत दुरूस्ती व पुर्नरचना मंडळ, मुंबई यांना लाचेची रोख रक्कम रू.२१,०००/– देण्याची इच्छा नसल्याने मी दिनांक २४/१०/२०१८ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथील कार्यालयात आलो व कर्तव्यावर असलेल्या पोलीस निरीक्षक विजय यादव यांचेकडे सविस्तर तक्रार सांगितली व तसा तक्रार अर्ज माझे स्वहस्ताक्षात इंग्रजीमध्ये लिहुन माझी सही करून पोलीस निरीक्षक विजय यादव यांचेकडे दिला. त्यानुसार पो.नि.विजय यादव यांनी कार्यवाही सुरू केली. पो.नि. विजय यादव यांनी काही वेळातच दोन सरकारी पंचांना पाचारण करून मी दिलेल्या तक्रारीबाबत त्यांना देखील माहिती दिली. त्यानंतर पोनि यादव यांनी मला दिनांक २५.१०.२०१८ रोजी कार्यालयात येण्याबाबत सुचना दिल्या होत्या परंतु कार्यकारी अभियंता देशमुख हे सदर दिवशी कोठेतरी मिटींगसाठी बाहेर जाणार असल्याबाबत मला माहिती मिळालेने मी लाप्रवि कार्यालयात जावुन सदरबाबत पोनि यादव यांना माहिती सांगितली त्याप्रमाणे पोनि यादव यांनी मला दिनांक २६.१०.२०१८ रोज सकाळी लाप्रवि कार्यालयात हजर राहणेबाबत सुचना दिल्या.

दिनांक २६/१०/२०१८ रोजी मी सकाळी लाप्रवि कार्यालयात हजर झालो. तेव्हा पोनि यादव यांनी पुन्हा नमुद दोन पंचांना बोलावुन घेतले. त्यानंतर मी स्वत: तसेच एक पंच सोबत घेवून ला.प्र.वि.मुंबई विभागातील पथकासोबत लोकसेवक सुर्यकांत देशमुख यांचे चंदनवाडी येथील कार्यालयात जावून ते माझ्याकडे लाच मागतात किंवा कसे याबाबत पो.नि. विजय यादव यांनी त्यांचे जवळील असलेला मायक्रो एस.डी. कार्डसहीत डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मला लावुन पडताळणी केली. त्यानंतर पडताळणी दरम्यान लोकसेवक सुर्यकांत देशमुख यांनी माझ्याकडे माझे झालेल्या कामाचे बिल मंजुर करण्याकरीता माझे इच्छेप्रमाणे लाच देण्याबाबत सांगितले. त्याप्रमाणे पडताळणी कार्यवाही पुर्ण करण्यात आली. परंतु सदरवेळी लोकसेवक सुर्यकांत देशमुख यांनी माझेकडे मागणी केलेल्या लाचेच्या रक्कमेबाबत स्पष्ट उल्लेख केला नसल्यामुळे पो.नि. यादव यांनी सदरबाबत पुन्हा पडताळणी करणे आवश्यक असल्याबाबत मला सांगितले व दोन दिवस शासकीय सुटटी असल्याने दोन दिवसानंतर लाप्रवि कार्यालयात येण्याबाबत सांगितले.

दिनांक ३०/१०/२०१८ रोजी पुन्हा नमुद दोन पंचांना बोलाविल्यानंतर मी स्वत: तसेच एक पंच सोबत घेवून ला.प्र.वि.मुंबई विभागातील पथकासोबत लोकसेवक सुर्यकांत देशमुख यांचे कार्यालयात जावून ते माझ्याकडे लाच मागतात किंवा कसे याबाबत पुन्हा वर नमुद केल्याप्रमाणे पडताळणी केली. सदर वेळी पो.नि. विजय यादव यांनी त्यांचे जवळील सीलबंद असलेला मायक्रो एस.डी.कार्डसहीत असलेला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर पंच व माझ्या समक्ष सील खोलून, नमुद व्हाईस रेकॉर्डर मध्ये नवीन पेन्सिल सेल टाकून माझे व पंचांचे वक्तव्य रेकॉर्डींग केले. पडताळणी दरम्यान लोकसेवक सुर्यकांत देशमुख यांनी माझ्याकडे कॉन्ट्रॅक्टच्या फाईलवर स्वाक्षरी करण्याकरीता माझे कामाचे एकुण बिलाची रक्कम रू ८००,०००/– च्या २ टक्केप्रमाणे रू १६,०००/– व व्हिजीलन्सचे रू ५०००/– असे एकूण रू.२१,०००/– रोख रक्कमेच्या लाचेची मागणी करून तडजोडीअंती रू.२०,०००/– ची लाच स्विकारण्याची तयारी दर्शविली. त्याप्रमाणे पडताळणी कार्यवाही पुर्ण करण्यात आली.



Imran Khatri

Scanned by CamScanner

**फिर्यादी इम्रान महम्मदअली खत्री, वय ३३ वर्षे यांचा दि.३१/१०/१८ रोजीचा फिर्यादी जबाब पुढे चालू...**

त्यानंतर पोलीस निरीक्षक विजय यादव यांनी काल दिलेल्या सुचनेनुसार मी आज दिनांक ३१/१०/२०१८ रोजी सकाळी ०९.४५ वा. ला.प्र.वि.,मुंबई कार्यालयात लोकसेवक सुर्यकांत देशमुख यांना लाच म्हणुन देण्यासाठी रू.२०,०००/— रोख रक्कम घेवून हजर राहिलो. तसेच त्यावेळी तेथे पंच श्री. निखील सोमनकर व श्री. केतन घाडगे हे देखील हजर झाले. त्यानंतर पो.नि.विजय यादव, सपोआ. संजय नाळे, पंच व पथक व मी असे पो.नि.विजय यादव यांचे सुचनेनुसार गोपनीय कक्षात गेलो. तेथे पो.नि.विजय यादव यांनी मला व पंचांना अॅन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगीतले. त्यानंतर पो.नि.विजय यादव यांनी मला सांगितले की, लोकसेवक सुर्यकांत देशमुख यांनी मागणी केल्यास त्यांना लाच म्हणून द्यावयाच्या रू.२०,०००/—च्या नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावण्यात येईल. त्यावेळी पो.नि.विजय यादव यांचे मागणीवरून माझ्याकडील रू. २०,०००/— (भारतीय चलनातील रू. ५००/—च्या ४० नोटा) त्यांचे ताब्यात दिल्या. पो.नि. विजय यादव यांनी पंचांसमक्ष मी दिलेल्या रू.२०,०००/—(भारतीय चलनातील रू. ५००/—च्या ४० नोटा) रोख रक्कमेच्या नोटांची झेरॉक्स काढली व त्यावर पंचांनी व पो.नि. विजय यादव यांनी सहया केल्या.

त्यानंतर मी दिलेल्या सदर नोटांवर पो.नि.विजय यादव यांचे सांगणेवरून पोलीस हवालदार परब यांनी अॅन्थ्रासिन पावडर लावली. ती लाचेची रू. २०,०००/— रोख रक्कम (भारतीय चलनातील रू.५००/—च्या ४० नोटा) पोलीस हवालदार परब यांनी माझ्या जीन्स पॅटचे पुढील बाजुच्या डाव्या खिश्यात ठेवली. त्यानंतर पो.नि. विजय यादव यांनी त्यांचे जवळील सीलबंद असलेला मायक्रो एस.डी.कार्डसहीत असलेला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर पंच व माझ्या समक्ष सील खोलून, नमुद व्हाईस रेकॉर्डर मध्ये नवीन पेन्सिल सेल टाकून माझे व पंचांचे वक्तव्य रेकॉर्डींग केले. तदनंतर १०.१० वा. पो.नि.यादव, सपोआ. संजय नाळे व पथकातील दोन कर्मचारी असे मी आणलेल्या खाजगी वाहन क्रमांक एमएच ४८ पी १०६१ स्वीप्ट डिझायर या वाहनातुन, मी व पंच सोमणकर असे माझे खाजगी मोटारसायकलवरून व पंच क्रमांक २ व इतर उर्वरीत पोलीस पथक असे शासकीय वाहनातुन लाप्रवि कार्यालयातुन निघुन म्हाडा सी—३ वॉर्ड, रोपा लेन, चंदनवाडी, मरीनलाईन्स पुर्व, मुंबई पासुन काही अंतरावर येवुन थांबलो. सदर ठिकाणी पो.नि.विजय यादव यांनी पुन्हा पंचांना व मला दिलेल्या सुचनांची उजळणी केली. तद्नंतर पो.नि. विजय यादव यांनी पुढील कारवाईच्या सुचना देताना, मला लोकसेवकाने लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर स्वतःचे मोबाईल फोनवरून Whatsapp द्वारे पो.नि. विजय यादव यांचे मोबाईल फोनवर Thumb up हे सांकेतीक चिन्ह सेंन्ट करण्याचा इशारा करण्याबाबत सांगितले.

त्यानंतर पो.नि.विजय यादव यांनी मायक्रो एस.डी. कार्डसहीत असलेला व्हाईस रेकॉर्डर चालू करून माझे शर्टाचे आतील बनीयनला लावला व त्यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे मी व पंच क्र. १ श्री. निखील सोमनकर यांचेसह माझे खाजगी मोटारसायकलवरून म्हाडा सी—३ वॉर्ड, रोपा लेन, चंदनवाडी, मरीनलाईन्स पुर्व, मुंबई येथील कार्यकारी अभियंता श्री. एस.एस.देशमुख, मुंबई इमारत दुरूस्ती व पुर्नरचना मंडळ, मुंबई यांचे कार्यालयात आलो. परंतु लोकसेवक सुर्यकांत देशमुख हे इतर कोणी अनोळखी व्यक्तीसमोर पैशाची बोलणी करणार नाहीत तसेच स्विकारणार नाहीत याकरीता मी पंच श्री सोमणकर यांना तळमजला येथे थांबवले व मी एकटाच त्यांचे पहिल्या मजल्यावरील कार्यालयात गेलो त्यावेळी त्यांचेकडे मेहबुब कुरेशी नावाचा कंत्राटदार बसला असल्यामुळे मी काही वेळ त्यांचे केबीन बाहेर थांबुन राहिलो. तेव्हा त्यांचे केबीनमध्ये मेहबुब नावाचे कंत्राटदार बसले असलेबाबत मला त्यांचे शिपाई नौशाद यांनी कळविले. काही वेळाने मेहबुब हे बाहेर आलेनंतर

....४/—

Scanned by CamScanner

मी लोकसेवक देशमुख यांचे केबीनमध्ये गेलो तेव्हा त्यांना मी लाचेची रक्कम आणली असलेबाबत सांगितले असता त्यांनी लाचेची रक्कम मेहबुब अली कुरेशी यांचेकडे देण्याबाबत सांगितले. त्याप्रमाणे मी लाचेची ठरलेली रक्कम रू. २०,०००/– लोकसेवक देशमुख यांचे कार्यालयाचे बाहेर उभे असलेले मेहबुब अली कुरेशी यांचेकडे दिली व त्यांना सांगितले की सदरची रक्कम ही लोकसेवक देशमुख यांनी त्यांचेकडे देण्याबाबत सांगितले आहे तेव्हा सदरची रक्कम ही मेहबुब अली कुरेशी याने स्विकारली व लोकसेवक देशमुख यांचेकडे केबीनमध्ये जावुन देवुन आला. मी लागलीच माझ्या मोबाईल फोनवरून Whatsapp द्वारे पो.नि. विजय यादव यांचे मोबाईल फोनवर Thumb up हे सांकेतीक चिन्ह सेंन्ट केले व ठरल्याप्रमाणे लाच स्विकारल्याचा इशारा केला.

सदर वेळी नमुद कार्यालयाबाहेर सापळा लावून थांबलेले पोलीस निरीक्षक विजय यादव व त्यांचे पथकाने लागलीच म्हाडाचे कार्यालयात येवुन कार्यकारी अभियंता सुर्यकांत एस.देशमुख यास ताब्यात घेतले. तेव्हा पंचांसमक्ष कार्यकारी अभियंता सुर्यकांत देशमुख यांचेकडे लाचेची रक्कम रू.२०,०००/– मिळुन आली. त्यानंतर पोलीस निरीक्षक विजय यादव यांनी सदरची लाचेची रक्कम पुढील तपासकामी पंच श्री.घाडगे यांच्या ताब्यात दिली.

तरी मी स्वत: कॉन्ट्रक्टर म्हणून काम घेतलेल्या 'टी.एस.के. कार्पोरेशन या कंपनीच्या १४–१६ एम.एस. एस लेन, (महादेव शंकर शेठ लेन), सोनापुर, मरीनलाईन्स (पु), मुंबई' येथील जुन्या 'सेज' (प्रॉपर्टी नं. सी–३५३०–३१, मेजरमेंन्ट बुक नं.६१७६८) अंतर्गत इमारतीचे दुरूतीचे कामकाजाच्या टेन्डर बिलाचे फाईलवर स्वाक्षरी करण्याकरीता म्हाडा सी–३ वार्डाचे कार्यकारी अभियंता श्री. सुर्यकांत शंकरराव देशमुख, वय ५५ वर्षे, मुंबई इमारत दुरूस्ती व पुर्नरचना मंडळ, मुंबई यांनी माझेकडे माझे कामाच्या एकुण बिलाची रक्कम रू ८००,०००/– च्या २ टक्के प्रमाणे रू १६,०००/– व व्हिजीलन्सचे रू ५०००/– असे एकुण रू. २१,०००/– रोख रक्कमेच्या लाचेची मागणी करून, तडजोडीअंती रू २०,०००/– स्विकारण्याची संमती दर्शवुन आज दिनांक ३१/१०/२०१८ रोजी नमुद लाचेची रक्कम स्विकारली, म्हणुन माझी म्हाडा सी–३ वार्डाचे कार्यकारी अभियंता श्री. सुर्यकांत शंकरराव देशमुख, वय ५५ वर्षे, मुंबई इमारत दुरूस्ती व पुर्नरचना मंडळ, मुंबई यांचेविरूध्द तक्रार असुन, त्यांचेविरूध्द कायदेशीर कारवाई होण्यास विनंती आहे.

माझा जबाब मराठीत संगणकावर टंकलिखित केला असून तो मला वाचून हिंदीतून समजावून सांगितला असून, तो मी सांगितल्या प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष,

(विजय यादव)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

Scanned by CamScanner

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे ..........
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. ★ चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.
..........

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकूण मुल्य ..........
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties) २०,०००/- शेष लाचेची रक्कम.

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक : ..........
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

यातील तारीख, वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीने स्वत: कॉन्ट्रॅक्टर म्हणून काम घेतलेल्या 'टी.एल.के. कार्पोरेशन' या कंपनीच्या १४-१६ एम.एल.ए. लेन, सोनापूर, मरीनलाईन्स, मुंबई येथील जुन्या सेस अंतर्गत इमारतीचे दुरुस्तीचे कामकाजाच्या टेन्डर बिलाचे फाईलवर स्वाक्षरी करण्याकरीता आरोपी लोकसेवक याने फिर्यादीकडे एकूण बिलाच्या २% रक्कमेअंतर्गत लाच म्हणून रु.२१,०००/- ची मागणी करुन तडजोडीअंती रु.२०,०००/- लाचेची रक्कम स्विकारली. म्हणून गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही :-** 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :
..........

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,
..........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .........., जिल्हा .........., राज्य ..........,
Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) .................. Rank.................. No. ..............
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to .......... (3) Transferred to P.S .........., District .......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.
F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name विजय यादव
पदनाम Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड. क्र. ला.प्र.वि. मुंबई.
Posting
Code No. of I.O. ..........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ..........
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned by CamScanner